दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६७ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.३० नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# लोकशाहीत बहुमताचा आदर करावा

## नितिश कुमार,ममता बॅनर्जींनीही बदलली होती भूमिका-पवार




**रायगड-बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार भूमिका घ्याव्या लागतात, आम्ही वरिष्ठांना सांगत होतो, पण त्यांनी ऐकलं नाही. नितीश कुमार, ममता बॅनर्जी आणि जयललिता यांनीही आपली भूमिका बदलली होती असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांना टोला लगावला. ते रायगडमधील कर्जत या ठिकाणी पक्षाच्या कार्यक्रमात बोलत होते.**

अजित पवार म्हणाले की, काहीजण विचार करत असतील ही भूमिका का घेतली? आम्ही साधू संत नाही. देशपातळीवर पाहिलं तर वेगवेगळे राजकिय पक्ष, वेगळ्या विचारसरणी सोबत जातात. परंतु स्वतःची विचारधारा सोडत नाहीत. आम्ही कुठल्याही समाजाला त्रास होऊ नये, त्यांनी एकोप्याने राहावं यासाठी प्रयत्न करत आहोत. सध्या राज्यांत वेगळं वातावरण आहे. प्रत्येकाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. संविधानाने तो अधिकर दिला आहे. परंतु त्यांनी लक्षात घ्यावं कुणालाही त्याचा त्रास होता कामा नये.अजित पवार म्हणाले की, लोकशाहीत काम करताना बहुमताचा आदर करावा लागतो. हे आम्ही आमच्या वरिष्ठांना सांगत होतो. पण त्यांनी आमचं ऐकलं नाही. राजकीय भूमिका घ्याव्या लागतात. नितीश कुमार, जयललिता, ममता बॅनर्जी यांनीही त्या त्या राजकीय परिस्थितीनुसार भूमिका घेतल्या. राज्यात देखील अनेकवेळा काही भूमिका घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे आपण देखील निर्णय घेतला आहे. निवडणूक काळात नम्रतने सामोरे जायला हवं. सत्तेतून लोकांची कामं करणं ही आमची भूमिका आहे. हातावर हात ठेऊन विरोध करत राहणं हे आमची भूमिका नाही.अलिकडच्या काळात विरोधी पक्षाचे लोक रोज काहीतरी बोलत असतात, आपण प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी बांधील नाही. आपण लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी बांधील आहोत असंही अजित पवार म्हणाले.आपली विचारधारा पक्की ठेऊन जर आपल्याला काम करता येत असेल, यशवंतराव चव्हाण यांचा विचार घेऊन पुढे जाता येत असेल तर मग सत्तेत सहभागी झालो तर बिघडलं कुठं? असा सवालही त्यांनी विचारला. ते म्हणाले की, आगामी काळात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका होणार आहेत. मधल्या काळात काही राजकीय बदल झाले. परंतु आता काम करत असताना यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेल्या, सत्तेतून बहुजन समाजाचा विकास या मार्गावर आपण चाललो आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या योजना शेवटच्या लोकांपर्यत पोहचवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.मराठा समाज मागण्याबाबत राजकीय पक्षांची बैठक घेतली. इतरांना दिलेल्या आरक्षणाला धक्का न लागता आरक्षण दिलं जावं अशी भूमिका घेण्यात आली आहे असं अजित पवार म्हणाले. काही दिवसांपूर्वी आजारी होतो, मला राजकीय आजार झाला अशी चर्चा झाली, पण मी लेचापेचा नाही असं अजित पवार यांनी ठणकावून सांगितलं.पाठीमागच्या काळात मंत्रिमंडळात महिलांना संधी देण्यात आली नव्हती. मात्र मी आदिती तटकरे यांच्या माध्यमातून ती संधी दिली आहे. आज मंत्रालयात येणाऱ्या नागरिकांना आपलं काम होतंय याचा विश्वास वाटला पाहिजे, त्यासाठी आम्ही दिवसरात्र काम करत आहोत असं अजित पवार म्हणाले.

# अरविंद विद्यानिकेतन,वरोरा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**वरोरा । प्रतिनिधी**



२८ नोव्हेंबर रोज मंगळवारला अरविंद विद्यानिकेतन,वरोरा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे म्हणून कवी,लेखक आणि निवेदक ना गो थुटें यांना आमंत्रित करण्यात आले होते. अतिथी म्हणून जेड.बी.लांबट आणि वी.जी.पिदुरकर, माजी मुख्याध्यापक, अरविंद विद्या निकेतन,वरोरा हेही हजर होते.

पाहुण्यांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमेला माल्यार्पण करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीत प्रस्तुत केले. ना गो थुटें यांचे स्वागत वैशाली पाटील यांनी केले जेड.बी.लांबट यांच स्वागत मोनाली माणूसमारे यांनी वी.जी.पिदुरकरांचे स्वागत पपीता चिडे यांनी केला.बंडावार ह्यांचे स्वागत ठेंगणे यामो , तसेच घडोले ह्यांचे स्वागत कळसकर यांनी केले. संगीत शिक्षक शुभम काटकर यांचे स्वागत विद्यार्थी शार्दुल प्रशांत घडोले ह्यांनी केले. विद्यार्थ्यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले ह्यांच्यावर आधारित वेशभूषा सादर केल्या.मुख्य पाहुणे कवी, लेखक आणि निवेदक ना गो थुटे यांनी ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर उपदेशात्मक भाषण केले.विद्यार्थीनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा धारण करुण त्यांच्या विषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन, शिक्षिका काजल मंत्री यांनी केले. तर आभार प्रगति लोहकरे यांनी केले .

# अजय कंकडालावार यांनी ३६ गावच्या शेतकऱ्यांच्या समस्या घेतल्या जाणून

**एटापल्ली । प्रतिनिधी**



आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे विदर्भ नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांनी काल एटापल्ली तालुक्यात दौरा केला होता. या दौऱ्यात तालुक्यातील आदिवासी विविध सहकारी संस्था उंडेरा,हेड्री,अंतर्गत येत असलेल्या ३६ गावच्या शेतकऱ्यांच्या समस्या बारदाना ची समस्या सातबारा ऑनलाईन करणे हमाली हमालीची थक बाकी व विविध समस्या शेतकऱ्यांनी अजय कंकडालावार यांच्या समोर मांडल्या असता.माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी अधिकारी बरगमकर यांच्याशी दूरध्वनी द्वारे बोलून शेतकऱ्यांचे समस्या त्वरित मार्गी लावण्याचे सांगीतले.येत्या पाच ते सहा दिवसात आपल्या समस्यांचे निराकरण करुण समस्या मार्गी लावण्याची ग्वाही माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी शेतकऱ्यांना दिली.तसेच शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी जाणून घेत विविध विषयावर चर्चा केली.यावेळी गावातील समस्त शेतकऱ्यांनी अजय कंकडालवार यांचे मानले आभार,.यावेळी एटापल्ली तालुका सचिव प्रज्वल नागुलवार,आदिवासी विविध सहकारी संस्था सचिव पदा,पोलिस पाटील अजय गावडे,सतू गावडे,चांदेकर काका,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,नरेश गर्गम,राकेश सडमेकसह ३६ गावाचे शेतकरी - आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली लावण्याकरिता आ.धानोरकर पावले उचलणार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीने वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्रातील आमदार प्रतिभा धानोरकर यांना निवेदन दिले. या निवेदनात, महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांचे ज्वलंत प्रश्न निकाली काढण्यासाठी आमदार प्रतिभा धानोरकरांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी करण्यात आली. या निवेदनावर आमदार प्रतिभा धानोरकर यांनी तातडीने प्रतिसाद दिला. त्यांनी लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत महावितरण प्रशासनाशी चर्चा करून त्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र डोंगरे, सचिव बाळकृष्ण गवळी, संयोजक अविनाश चव्हाण यांच्यासह अनेक लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीचा कार्यकाळ पाहता, जे तळागाळात कार्यरत असणारे लाईनस्टाफ कर्मचारी यांचे ज्वलंत प्रश्नांबाबत ठोस निर्णय अद्याप झालेला नाही. या श्रेणीवर अन्याय होत आहे. महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समिती मार्फत ९ संघटना व अभ्यास वर्गाने या अन्याय विरोधी आंदोलन नोटीस दिली आहे. महावितरण प्रशासन स्तरावर दोन बैठका अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व संचालक (मानव संसाधन) स्तरावर चर्चा झाली, परंतू चर्चा चे लेखी स्वरुपा मध्ये कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याने महाराष्ट्रातील लाईनस्टाफ हा असंतोषीत आहे.यामुळे या लाईनस्टाफना न्याय देण्यासाठी आमदार प्रतिभा धानोरकरांनी चर्चेमार्फत पुढाकार घ्यावा अशी निवेदनात मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, लाईन स्टाफ बांधवाचे ज्वलंत प्रश्न मार्गी लागावे हे स्वप्न आहे. ते पूर्ण होईपर्यंत लाईनस्टाफ शांत बसणार नाही. विधायक मार्गाने न्यायासाठीचा लढा सुरु राहणार आहे. याकरीता आमदार धानोरकरांनी चर्चेमार्फत न्याय द्यावा अशी लाईनस्टाफची मागणी या अधिवेशनात बैठक घेऊन मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# 'महाज्योती' संस्थेतील प्रश्न निकाली काढण्या करिता पाठपुरावा करणार-आ.प्रतिभा धानोरकर

## महाज्योती संशोधक विद्यार्थी कृती समितीच्या शिष्टमंडळाशी चर्चा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२०२३ वर्षातील अर्ज करणाऱ्या व सर्व पात्र विद्यार्थ्यांना सरसकट व नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळणे तसेच २०२१,२०२२ व २०२३ या वर्षातील विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन / नोंदणी दिनांकापासून महाज्योती संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील संशोधक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्तीची मागणी महाज्योती संशोधक विद्यार्थी कृती समिती चंद्रपूर (महाराष्ट्र राज्य) यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन आमदार प्रतिभा धानोरकर यांना देण्यात आले. या निवेदनावर आमदार प्रतिभा धानोरकर यांनी तातडीने प्रतिसाद दिला. त्यांनी या प्रश्नांबाबत महाज्योती प्रशासनाशी चर्चा करून त्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करू असा आश्वासन दिले आहे. राज्य शासनाच्या वतीने 'महाज्योती' या संस्थेमार्फत मन २०२० पासून राज्यातील ओबीसी, एनटी. व्हीजेएनटी, प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांना 'महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती ' च्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येते ओबीसी, एनटी, व्हीजे, एमबीसी, इत्यादी गरीब, गरजू परिस्थितीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही संस्था अत्यंत उत्तम पद्धतीने काम करत आहे. परंतु २०२३ या वर्षातील संशोधक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती जाहिरातीत अनेक दोष दिसत आहेत. २०२१,२०२२ या वर्षात संशोधन अधिछात्रवृत्ती देण्याकरिता कोणतीही मुलाखत अथवा परीक्षा घेण्यात आलेली नाही, अर्ज करणाऱ्या व पात्र सर्व विद्यार्थ्यांना सरसकट ही अधिछात्रवृत्ती देण्यात आलेली आहे. सन २०२१ मध्ये ९५७ तर २०२२ मध्ये १२३९ वियार्थ्यांना याचा लाभ झालेला आहे. २०२३ वर्षातील अर्ज करणाऱ्या व पात्र सर्व विद्यार्थ्यांना सरसकट व नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळणे. २०२३ मधील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची परीक्षा न घेता अधिछात्रवृत्ती द्यावी. २०२१, २०२२ व २०२३ या वर्षातील विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन / नोंदणी दिनांक पानून अधिछात्रवृत्ती देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी अक्षय पिंपळकर, अंकित मुंगळे, नागेश बोधे, प्रगती तुराळे उपस्थित होते. वरील मागण्या मार्गी लावण्याकरिता पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दिले.

# ना.सुधीर मुनगंटीवार करणार नागरिकांच्या तक्रारीचे निवारण

## चंद्रपूर येथील नियोजन भवनात महाजनसंपर्कचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या निकाली काढण्याकरीता राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री आणि चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार हे 'महाजनसंपर्क' घेणार आहेत. शुक्रवार, १ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ०४ ते रात्री ०८ वाजेपर्यंत ना. मुनगंटीवार प्रत्यक्ष नागरिकांच्या तक्रारी ऐकणार आहेत. नियोजन भवन येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत ते जिल्ह्यातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ निर्देश देणार आहेत. आपल्या समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी नागरिक वेगवेगळ्या सरकारी विभागांच्या कार्यालयांच्या फेऱ्या मारत असतात. परंतु अनेकदा त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे त्यांची गैरसोय होते. चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांना अशा गैरसोयीचा सामना करावा लागू नये, यासाठी पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. त्यातून ते शुक्रवारी 'महाजनसंपर्क' घेणार आहेत. या महाजनसंपर्काचा जिल्ह्यातील समस्त शेतकरी, महिला, विद्यार्थी,नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन पालकमंत्री यांनी केले आहे.

सह्याद्रीचा राखणदार



## संपादकीय

# गाफिलपणाला क्षमा नाही !

समुद्रमार्गे पाकिस्तानातून दहा दहशतवादी सर्व शस्त्रांनिशी एका रात्री मुंबईत उतरतात आणि संपूर्ण मुंबईला तीन दिवस वेठीस धरतात, १६० निष्पापांचा जीव घेतात आणि आणखी तीनशे जणांना घायाळ करून सोडतात. पंधरा वर्षांपूर्वी मुंबईवर झालेल्या या निर्घृण दहशतवादी हल्ल्याच्या भळभळत्या जखमा आजही कायम आहेत. दर वर्षी या हल्ल्यातील हुतात्म्यांना आदरांजली वाहतानाच आपण आपल्या सागरी संरक्षणसिद्धतेचा आढावा घेत असतो. खेदाची बाब म्हणजे आज पंधरा वर्षे होऊनही सागरी सुरक्षेतील पळवाटा पुरत्या बंद झालेल्या नाहीत आणि गस्तीनौकांपासून मनुष्यबळापर्यंतची कमतरता, प्रशिक्षणाचा अभाव, बेकायदा धंद्यांचे ग्रहण, लालफितीचा कारभार, यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव या समस्या कायम आहेत.मुंबई पोलिसांच्या ताफ्यातील किनारी गस्तीसाठी असलेल्या २३ पैकी आठच नौका सुस्थितीत आहेत आणि २३०६ पदांपैकी अवघे एक चतुर्थांश मनुष्यबळ उपलब्ध आहे, ही उद्विग्न करणारी बाब आहे. सुरक्षेतील ढिलाईची कारणे नित्यनेमाने तीच राहिली आहेत, ही अधिकच चिंतेची बाब. अगदी उदाहरणच द्यायचे झाले, तर सागरी पोलिस ठाण्यात भरती झालेल्या पोलिसांना समुद्रावरील गस्तीमध्ये मळमळ किंवा समुद्रीअस्वास्थ्याचा त्रास होणार, हे स्वाभाविकच आहे; परंतु त्यावर काही तोडगा काढलेला नाही. या कामांसाठी समुद्री वातावरणाला सरावलेले मनुष्यबळच भरती करणे गरजेचे ठरते. एकूणच पोलिस दलामध्ये अशा ड्युट्यांना साइडपोस्टिंग म्हणून हिणवण्याची वृत्ती असते किंवा मग किनारी भागातील अवैध धंद्यांमार्फत खिसा भरण्याकडे काही वर्दीधारींचा कल असतो. हाच प्रकार कस्टम्स, आदी यंत्रणांमध्येही आढळतो. १९९३ च्या बॉम्बस्फोट मालिकांमध्ये रायगडकिनाऱ्यावर आरडीएक्स उतरले, तेव्हाही याच अपप्रवृत्तींमुळे ते शक्य झाले होते. पुढे पंधरा वर्षांत त्याच कटकारस्थानाची पुनरावृत्ती झाली. साहजिकच भारताला लाभलेल्या विस्तीर्ण किनारपट्टीवर अहोरात्र डोळ्यात अंजन घालून सुरक्षा ठेवण्याखेरीज गत्यंतर नाही. इथे गाफिलपणाला जराही क्षमा नाही.कडेकोट सुरक्षाकडे असूनही ते भेदता येते, याचे दाखले अमेरिकेतील ट्वीन टॉवर हल्ला व इस्रायलमधील हमासचे हल्ले यातून मिळाले आहेत. तेव्हा सुरक्षेच्या बाबतीत मुंबईसारख्या शहरांमध्ये असलेली अनास्था अजिबात परवडण्याजोगी नाही. २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यानंतर देशातील किनारी सुरक्षेमध्ये काही आमूलाग्र बदल करण्यात आले. नौदल, तटरक्षक दल आणि स्थानिक पोलिस अशी त्रिस्तरीय यंत्रणा सध्या अस्तित्वात आहे. मात्र, किनारी सुरक्षेतील त्रुटी अजून पुरत्या बंद झालेल्या नाहीत. वर्षभरापूर्वी ओमानमधून भरकटलेली एक छोटी नौका रायगडमधील श्रीवर्धन किनाऱ्यावर येऊन धडकली होती. अशा बेवारस तरंगत्या वस्तू हे दहशतवाद्यांच्या हातचे जीवघेणे खेळणे असू शकतात, हा धडा त्यातून मिळाला. किनारी भागांना आजही बेकायदा धंद्यांचा वेढा आहे. मात्र, मतपेटी प्रिय असल्याने या बेकायदा गोष्टींवर कारवाई करण्यास कुणी धजावत नाही. कुलाब्यात नौदलाच्या तळाला व हेलिकॉप्टर तळाला खेटून किंवा मुंबई विमानतळालगत असलेल्या बेकायदा वस्त्यांवर कधीही कुणी अंकुश ठेवलेला नाही. हेलिकॉप्टर तळालगतची भिंत उंच केल्यावर पलिकडून त्याला खेटून आणखी उंच बांधकाम केले जाते. शहरांमधील रेल्वे स्थानके आणि इतर गर्दीच्या ठिकाणांनाही एका विशिष्ट प्रवेशद्वाराची चौकट नाही. त्यामुळे बॅगस्कॅनर, मेटल डिटेक्टर हे कुचकामीच ठरतात. शहरातील आगंतुक संशयितांवर नजर ठेवण्याची कडेकोट यंत्रणा जोपर्यंत आपण उभी करत नाही, तोपर्यंत आपण कायम हल्लेखोरांच्या भक्ष्यस्थानी राहणार, हे उघड आहे. गेल्या दीड दशकांत तिन्ही दलांकडे संरक्षणसामग्री मोठ्या प्रमाणात आली. आधुनिकता वाढीस लागली. किनारपट्टीवर रडारयंत्रणा व शहरभर सीसीटीव्हींचे जाळेही विस्तारले; परंतु त्याच वेळी जगातील दहशतवादाचा आणि युद्धखेळींचा चेहराही बदलला आहे. ड्रोनसारख्या वैमानिकविरहित वस्तू आता दहशतवाद्यांच्याही हाती आहेत. समुद्राप्रमाणेच हवाई हल्ल्यांचीही शक्यता ध्यानात ठेवावी लागेल.महामुंबई परिसरातील किनारी भागांचा भौगोलिक नकाशा विविध पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे पालटून गेला आहे. विशाल पूल, बोगदे, किनारी मार्ग हे पायाभूत सुविधांमधील नवे आविष्कार असले, तरी ते सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील भाग ठरणार आहेत. त्याचप्रमाणे जगभर सुरू असलेल्या प्रत्येक गोष्टीचा मुंबईसारख्या शहरांच्या सुरक्षेशी थेट संबंध असतो. इस्रायल व गाझापट्टीतील संघर्ष असो, की रशिया-युक्रेन युद्ध. मुंबई ही दहशतवाद्यांचे सॉफ्ट टार्गेट नेहमीच असते. वरकरणी स्थानिक, जातीय, धार्मिक वाटणाऱ्या दंगली, हिंसक आंदोलने यामागे व्यापक दहशतवादी कटकारस्थानाचा भागही असू शकतो; परंतु स्थानिक पातळीवर पूर्वनियोजित हिंसक कटकारस्थाने करणाऱ्यांनाही राजकीय कळवळ्यापोटी क्षमाभाव दाखविण्याचाच पायंडा रुजत चालला आहे. तेव्हा नक्की जरब कुणाची व कशी बसणार? जगातील एक बलाढ्य अर्थव्यवस्था होण्याच्या स्वप्नावर आपण स्वार असताना आपल्या देशाच्या जीवितसुरक्षेशी तडजोड खचितच चालणार नाही. सुरक्षा हा विषय २६ नोव्हेंबरपुरता नाही, तर कायमचा अजेंड्यावर हवा.

# अर्थकारण बदलणारे 'मधाचे गाव'



महात्मा गांधीजींचा स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर विश्वास होता. खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाली तरच भारताचा विकास होईल ही त्यांची धारणा होती. त्यामुळेच त्यांनी कुटीर उद्योगांना चालना देण्याचा विचार मांडला.मधमाशी हा निसर्गाच्या अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक. त्यावर आधारित मधउद्योग हा कुटीरोद्योगाचा एक भाग आहे. हा उद्योग केवळ शेतीपूरक व्यवसाय व जोडधंदा म्हणून न राहता एक प्रमुख व्यवसाय केल्यास ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. हो ओळखून खादी व ग्रामोद्योग मंडळाने विविध उपक्रम सुरू केले आहेत.मधमाश्यांद्वारे परागीभवन होऊन विविध पिकांच्या व अन्य महत्त्वपूर्ण वनस्पती, फळझाडे यांच्या उत्पन्नात वाढ निश्चित होते. त्यादृष्टीने मधमाशापालन हा उद्योग कृषी उत्पादनवाढीसाठी तसेच सेंद्रिय शेतीसाठीही महत्त्वाचा आहे.भारत -बांगलादेश सीमेवर घुसखोरी रोखण्यासाठी आता सीमा सुरक्षा दलाच्या वतीने मधपेट्या ठेवण्यात येणार असून देशाच्या सुरक्षेसाठीही मधमाश्यांचा उपयोग केला जाणार आहे. पर्यावरणाच्या संतुलनापासून देशाच्या सुरक्षेपर्यंत मधमाश्यांचे महत्त्व अधोरेखित होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मधुक्रांती' या कार्यक्रमाची अंमलबजावणी २०१७मध्ये सुरू केली. मधमाश्यांच्या वसाहतींचे जतन व संवर्धन करणे याची आवश्यकता ओळखून राज्य खादी मंडळाने 'मधाचे गाव' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात १६ मे २०२२ पासून सुरू केला आणि सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर तालुक्यातील पहिले मधाचे गाव - मांघर विकसित होऊ लागले.आता कोल्हापूर जिल्ह्यात भुदरगड तालुक्यातील 'पाटगाव' या गावास राज्यातील दुसरे मधाचे गाव होण्याचा मान मिळाला. मंडळाने मधाच्या गावाची निवड करताना काही निकष ठरविले आहेत.मधाचे गाव हे डोंगराळ व जंगली भागात असावे, परिसरात सातेरी व आग्या मधमाश्यांची उपलब्धता असावी, पर्यटनास अनुकूलता, भौगोलिकदृष्ट्या मधमाश्यांना पूरक असणारी शेती, पिके वनसंपदा व मुबलक फुलोरा खाद्य, मधाचे संकलन व व्यवसाय करणारे शेतकरी व नागरिक,स्थानिक ग्रामस्थांना मधमाश्यापालन व मधसंकलन करण्यात रुची आणि ग्रामसभा ठराव व मुख्य म्हणजे जनसहभागीदारिता, हे निकष विचारात घेतले जातात. मधाच्या गावामुळे त्या गावातील अर्थकारण निश्चित बदलते. जिथे फुलोरा जास्त आहे त्या काळात एका मधपेटीतून सामान्यतः २५-३० किलो मध निघतो.शेतकऱ्याने दहा मधपेट्या बाळगल्यास वर्षाला एका शेतकऱ्यास कमीत कमी ३०० किलो मध मिळतो. याचाच अर्थ वर्षाकाठी एका शेतकऱ्यास १.५०-१.७५ लाख रुपये प्राप्त होतात. या व्यतिरिक्त मधाच्या पोळयातून निघणाऱ्या मेणापासून अन्य उत्पादनेसुद्धा मधपाळांना तयार करता येतात.मांघरचे उदाहरण द्यायचे झाले तर, मांघर येथे सन १९५५ पासून मधपाळ व्यवसाय करतात. आज मधाचा दर मंडळ रुपये पाचशे प्रतिकिलो देत आहे. मधाचे गाव घोषित होण्यापूर्वी मधाचे उत्पन्न १८०० ते २००० प्रतिकिलो होते.आता ते ३५०० ते ३६०० प्रतिकिलो झाले. पश्चिम घाट विकास कार्यक्रम व समूह विकास कार्यक्रमांतर्गत गावात सुमारे ३५०० मधपेट्यांचे वाटप करण्यात आले. गावात १०० टक्के कुटुंबे आता मधमाश्यापालन व्यवसाय करू लागले आहेत. ग्रामस्थांनी मधाचे गाव हा स्वतःचा ब्रँड विकसित केला आहे.पाटगाव गावामध्ये २६० मधपाळ आहेत. त्यांपैकी ५६ सेंद्रिय मधसंकलक आहेत. या गावात १९६०पासून मंडळाच्या वेगवेगळ्या योजनांतर्गत मधपाळांना पेट्या वाटप व प्रशिक्षण देण्यात आले आहे. मंडळामार्फत हमी भावाने मध खरेदी केला जातो.मधाचे गाव घोषित होण्यापूर्वी ४०० ते ५०० किलो मध मंडळाने खरेदी केला व गाव घोषित झाल्यानंतर ३२०० किलो मध खरेदी केला. उत्पादन चार हजार ते पाच हजार किलो वरून सुमारे सात हजार ते आठ हजार किलो इतके वाढले आहे.१०० मधपालकांना बी ब्रीडिंग प्रशिक्षण दिले आहे. मेणपत्रा व मधाची पोळी सुरक्षित ठेवण्यासाठी रसायने मंडळामार्फत दिली जातात. चालू वर्षी १५०० मध पेट्या मंडळामार्फत अनुदान देण्यात येणार आहे. व आणखी ५०० मधपाळांना पुढील काळात तीन हजार मधपेट्यांचे वाटप करण्यात येईल.ज्यावेळी एक रुपयाचा मध निघतो, त्यावेळी शेतीतून दहा रुपयांचा लाभ होतो. मांघर मधाचे गाव झाल्यापासून सातारा जिल्ह्यातील एकूण मध संकलनाच्या १०टक्के मध संकलन मांघरमधून होण्यास सुरुवात झाली. वर्षभरात दोन लाख पर्यटकांनी या गावास भेट दिली. तेथील ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वामित्व स्वीकारले असून सामूहिक मधमाशापालन आता होत आहे हे त्याचे यश म्हणता येईल.मधाचे गाव ब्रँडमुळे मांघरमध्ये पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे. त्यामुळे पर्यटकांची निवासव्यवस्था, हॉटेलिंग, वाहनांची दुरुस्ती दुकाने, पार्किंग, जलपान, चहा, गाईड अशा पूरक व्यवसायांना गती मिळाली आहे.पाटगावचेही अर्थकारण पुढील काळात बदलेल. शेतकऱ्यांना शेतीव्यतिरिक्त अन्य स्त्रोतातून उत्पन्न मिळावे, गावकऱ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, गाव स्वयंपूर्ण व्हावे आणि महाराष्ट्र मध समृद्ध व्हावा यासाठी राज्य खादी मंडळाने 'मांघरच्या' धर्तीवर राज्यात आणखी गावे 'मधाची गावे' करण्याचा संकल्प केला आहे.राज्याच्या सहा प्रशासकीय भागात किमान एक गाव पुढील सहा महिन्यांत 'मधाचे गाव' म्हणून विकसित व्हावे यासाठी मंडळ पावले उचलत आहे. राज्यात विद्यमान स्थितीत ११४७ गावांमधून ४४०३ मधपाळ, ३०८०० मधपेट्यांमधून मध काढत आहेत. एकूण वसाहती १८३२९ आहेत. मधाच्या गावामुळे या सर्व संख्येत वृद्धी होईल.मांघर आणि पाटगाव नंतर राज्यात आमझरी (अमरावती), गुहिणी (पुणे), घोलवड (पालघर), बदलापूर (ठाणे), देवडे (रत्नागिरी), मुख्यमंत्र्यांचे मूळ गाव दरे-तांब (सातारा), आंबोली (सिंधुदुर्ग), पिर्ली (चंद्रपूर) व लेखा-मेंढा (गडचिरोली), किनवट (नांदेड) या जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण होऊन त्यातील गावांची प्राथमिक निवडही झाली आहे.यातील काही ठिकाणी स्थानिक ग्रामसभेचे ठरावही मंडळास प्राप्त झाले आहेत. 'मधाचे गाव' या संकल्पनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेस निश्चित गती मिळेल. मधाच्या गावच्या पंचक्रोशीतील गावे स्वयंपूर्ण होतील, शुद्ध सेंद्रिय मध उपलब्ध होईल. पर्यटन व्यवसाय वृद्धिंगत होईल व शाश्वत विकासाकडे एक पुढचे पाऊल पडेल. 'मधाचे गाव' ही चळवळ झाली तर महाराष्ट्रात मधुक्रांती होईल, असा राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास विश्वास आहे.राज्यातील वनसंपदा, फुलशेती, पीक उत्पादने, नैसर्गिक फुलोरा व मधमाश्या पालन करणारे शेतकरी/ मधपाळ या घटकांचा अभ्यास करुन मधाच्या गावांची निवड करणे.संपूर्ण साखळी म्हणजे मधमाश्यांना पोषक असे वृक्ष वनस्पतींच्या लागवडीपासून, मधमाश्यापालनासह मध संकलन, मध प्रक्रिया, ब्रँडिंग व पॅकिंग करून मध व मधमाश्यांपासून तयार होणाऱ्या उप-उत्पादनांच्या विक्रीची व्यवस्था करणे तसेच या उत्पादनापासून तयार होणाऱ्या अन्य उत्पादकांच्या उद्योगांना प्रोत्साहन देणे.ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांना मधमाश्यापालनाकडे वळविणे व कायमस्वरूपी रोजगार निर्माण करणे. वाढत्या रासायनिक कीटकनाशक फवारणीस प्रतिबंध करणे व सेंद्रिय शेतीस चालना देणे.कृषि पर्यटनाच्या धर्तीवर मधुपर्यटनास चालना देणे व मधमाश्यांच्या महत्त्वाबाबत प्रचार व प्रसिद्धी करणे. निसर्गातील मधमाश्यांची घटती संख्या वाढविण्यासाठी राणी मधमाशी पैदास कार्यक्रम राबविणे.

# स्मार्ट कॅप्सूल



गेल्या वर्षी ज्येष्ठ संगीतकार बप्पी लाहिरी यांचे 'स्लीप ॲप्निया' विकाराने निधन झाले आणि या विकाराविषयी सर्व लोक अवगत झाले. या घटनेपूर्वी स्लीप ॲप्नियाबद्दल लोकांना फारशी माहिती नव्हती. हा विकार झालेल्या व्यक्तीची श्वासोच्छ्वास प्रक्रिया झोपेत असताना काही काळ थांबते. साहजिकच या काळात शरीराला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे ती व्यक्ती अस्वस्थ होते आणि जोराने श्वास घेऊ लागते. श्वासोच्छ्वासात दीर्घकाळ व्यत्यय आल्यास रक्तातील ऑक्सिजनची पातळी कमी होऊन रुग्णाचा मृत्यू होतो. अनेकदा हा विकार जडल्याचे लक्षातही येत नाही. विकाराचे योग्य निदान होण्यासाठी त्या संभाव्य रुग्णाला रात्रभर हॉस्पिटलमध्ये थांबावे लागते. तेथे यंत्रांच्या मदतीने त्या व्यक्तीचा श्वासोच्छ्वास, हृदयाचे ठोके इत्यादी घटक तपासले जातात.स्लीप ॲप्नियाचे निदान करण्यासाठी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील संशोधकांनी एक 'स्मार्ट कॅप्सूल' तयार केली आहे. नेहमीच्या कॅप्सूलच्या आकाराची ही स्मार्ट कॅप्सूल म्हणजे एक लहानसे इलेक्ट्रॉनिक यंत्र असून, त्यामध्ये प्रामुख्याने त्वरणमापक (ॲक्सलरोमीटर) आणि प्रक्षेपकाचा समावेश आहे. औषधाच्या इतर गोळ्यांप्रमाणे ही कॅप्सूल पाण्याबरोबर गिळली, की ती व्यक्तीच्या पचनमार्गावाटे आतड्यात जाऊन पोहोचते. आतड्यात गेल्यावर ही कॅप्सूल त्या व्यक्तीच्या श्वासोच्छ्वासाचा दर आणि हृदयाचे ठोके मोजते. हे सर्व मोजमापन संगणकाच्या मदतीने पाहता येते आणि त्याची नोंदही ठेवता येते. सकाळी विष्ठेबरोबर ही कॅप्सूल शरीराबाहेर टाकली जाते. ही कॅप्सूल काही दिवस व्यक्तीच्या आतड्यात राहू शकेल आणि श्वासोच्छ्वासात अडथळा आल्यावर योग्य औषधे त्यातून शरीरात सोडली जातील, अशी व्यवस्था करण्याचे संशोधकांचे प्रयत्न सुरू आहेत.सुरुवातीला या कॅप्सूलचे प्रयोग डुकरांवर करण्यात आले. त्यानंतर सरासरी ४१ वर्षे वयाच्या दहा व्यक्तींवर या कॅप्सूलची चाचणी घेण्यात आली. हे सर्व प्रयोग यशस्वी झाले असल्याने या स्मार्ट कॅप्सूलच्या मदतीने स्लीप ॲप्नियावर घरच्या घरी लक्ष ठेवणे भविष्यात शक्य होईल.

# गुरांशिवाय दूध,कोंबडीशिवाय अंडी





रायन बेथेनकोर्ट या जीवशास्त्रज्ञाने २०१३मध्ये कॅलिफोर्नियात 'काऊंटर कल्चर' प्रयोगशाळेची स्थापना केली. यांनी शाश्वतरित्या अन्ननिर्मितीचे प्रयत्न जैवतंत्रज्ञानाच्या साहाय्याने करायला सुरुवात केली. 'संश्लेषित जीवशास्त्र' या नव्या विषयांतर्गत, दूध, मांस, अंडी, कॉलाजेन अशा प्राणिज पदार्थांचे पर्यायी पदार्थ प्राण्यांचा वापर न करता निर्माण करण्यासाठी ते सर्वशक्तीनिशी उतरले.प्राणिज पदार्थ मिळवताना कार्बनी पाऊलखुणा वाढतात, जल-भूमीचाही अवाजवी वापर होतो. मात्र जैवतंत्रज्ञानाने अशी उत्पादने निर्माण केली, तर आपसूकच कार्बनी पाऊलखुणा कमी होतात, इतर संपदांचाही ऱ्हास टळतो. गायी-म्हशींना त्रास न देता, त्यांची कामे जीवाणूंचे कारखानेच करतात. प्रयोगशाळेत तयार केलेले मांस हिंसा रोखते. ही उत्पादने आता परवडेल अशा किमतीत मिळतात. 'काऊ-फ्री' दूध ही संकल्पना 'व्हेगन'ना फायद्याची पडते. क्लारा फुड्स ही कंपनी अंड्यातील पांढरे प्रथिन तयार करू लागली, तर जेल्टॉर नावाचा व्यवसाय प्रयोगशाळेत कॉलाजेन तयर करू लागला.या प्राणिज उत्पादननिर्मितीमध्ये किण्वन प्रक्रिया केल्या जातात. संशोधकांनी यीस्टच्या जनुकांत उपयुक्त जनुके घुसवून 'बायोरिॲक्टर'आधारे त्यांना प्रथिननिर्मिती करायला भाग पाडले. हे सूक्ष्मजीव त्या उत्पादनांचे कारखानेच झाले. गायीच्या दुधातील प्रथिनांची अशाप्रकारे निर्मिती करून, त्यात वनस्पतीजन्य शर्करा, मेद घालून कृत्रिम दूध, त्यापासून चीज, योगर्ट तयार होऊ लागले.नैसर्गिक दुग्धोत्पादन व्यवसायाच्या तुलनेत अशा दुग्धोत्पादनाला लागणारी जागा, पाणी हे दोन तृतीयांशाने कमी असते. खिल्लारे जोपासताना कार्बन डायऑक्साइड, मिथेनची निर्मिती होते. प्रदूषण, भू-वापर, पशुकल्याण योजना, रोगराई अशा सर्व बाबी यांमुळे टाळता येतात, जीवाश्म इंधनबचत आणि जागतिक तापमानवाढीला आळा हे दोन उद्देश साध्य होतात. येत्या दशकात या उत्पादनात अजून सुधारणा होतील. न्यू हार्वेस्ट कंपनीच्या अमेरिकास्थित संचालक ईशा दातार यांनी पेशीय कृषी ही संकल्पना दृढ केली. परदेशी बाजारात दूधनिर्मितीसाठी, १३ महिन्यांच्या गायीला कृत्रिम रेतनाने गर्भवती करून, नंतर वासराला दूर करून दोन वर्षे गायीला सतत दूध देण्याच्या अवस्थेत ठेवले जाते. नर वासराला लागलीच, तर गायीला चार वर्षांनंतर मारून टाकले जाते. या निर्मम कृती थांबवण्यासाठी यीस्टआधारे जैवतंत्रज्ञानाने दूधनिर्मिती केव्हाही उत्तम, असे त्या सांगतात.

# लाहेरी पोलीस स्टेशन येथे भव्य रेला स्पर्धा व जनजागरण मेळाव्याचे आयोजन

## पीएलजीए नक्षल सप्ताहाच्या तोंडावर नागरिकांचा मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**गडचिरोली :–**
गडचिरोली जिल्ह्यातील लाहेरी सारख्या अधिक दुर्गम, अतिनक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील भागात शिक्षणाची, मार्गदर्शनाची कमतरता असल्यामुळे समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या नागरिकांची दखल घेत लाहेरी पोलिसांनी येथील पीडित,दुर्लक्षित नागरिकांना मुख्य प्रवाहमध्ये आणण्याकरिता पोलीस दादालोरा खिडकी अंतर्गत २९ नोव्हेंबर रोजी लाहेरी पोलीस स्टेशन येथे भव्य जनजागरण मेळावा व रेला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान भारतीय डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आधार कार्ड , तर शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सीआरपीएफ ३७ बटालियनचे असिस्टंट कमांडर रंजीत कुमार रंजन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य ,जन नायक बिरसा मुंडा, यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उप पोस्टे लाहेरी चे प्रभारी अधिकारी संतोष काजळे यांनी प्रास्ताविकपर भाषण केले. त्यामध्ये त्यांनी लाहेरी भागातील नागरिकांना प्रवाहामध्ये आणण्यासाठी आम्ही कायम तत्पर असू असे आश्वासन दिले. तसेच गावातील सुशिक्षित युवकांनी पुढे येण्याची गरज आहे असे सांगितले. तसेच नागरिकांच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या विविध योजनांचे व त्याबाबत असलेले लाभ याबाबत सखोल मार्गदर्शन केले व जास्तीत जास्त नागरिकांना विविध योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभ देण्याचा व प्रयत्न करू असे आश्वासन दिले. पीएसआय डगवार यांनी पोलीस दादालोरा खिडकी अंतर्गत चालू करण्यात आलेल्या विविध योजने बाबत नागरिकांना व त्यांच्या कुटुंबांना आर्थिक ,आरोग्य , शैक्षणिक, सक्षमीकरण करण्याचे आश्वासित केले. तसेच मेळाव्याची रूपरेषा सांगितली.यानंतर कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक काळे आणि सचिन सरकटे यांनी आलेल्या सर्व नागरिकांना, महिलांना, पोलीस स्टेशन अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.सदर कार्यक्रमास मौजा लाहेरी पोलीस स्टेशन हद्दीतील, अति दुर्गम अति नक्षलग्रस्त विविध गावांमधील लोक मोठ्या प्रमाणावर हजर होते.तसेच विविध खेड्यापाड्यांमधून नक्षल सप्ताह तोंडावर असताना त्यांच्या विचारधारेला तिलांजली देऊन महीलांनी, युवक युती नागरिकांनी, मोठ्या प्रमाणावर मेळ्याव्यास हजेरी लावली होती. मेळावा दरम्यान रिलाय स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणावर संघाने सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये मौजा होडरी संघाने प्रथम, लाहिरी द्वितीय, भुसेवाडा तृतीय असे क्रमांक पटकावले सर्वांना बक्षीसे वाटप करण्यात आली व इतर संघांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आली.जमलेल्या ७०० ते ८०० नागरिकांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.कार्यक्रमाची सूत्रसंचालनाची धुरा उप पोस्टे लाहेरी चे पीएसआय प्रशांत डगवार यांनी सांभाळली. पीएसआय सचिन सरकटे नागरिकांचे व प्रमुख पाहुण्यांचे व सदर कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेणारे एसआरपीएफचे व उप पोस्टे लाहेरी, सी आर पी एफ चे अंमलदार व अधिकारी यांचे आभार व्यक्त केले.सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष लाहेरी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी संतोष काजळे व प्रमुख पाहुणे सीआरपीएफचे रंजीत कुमार रंजन, पोलीस निरीक्षक पॉल हे होते. कार्यक्रमास सीआरपीएफ बटालियन ३७ कंपनी ए व सी चे पोनि व सर्व जवान उपस्थित होते.तसेच विविध गावचे तरुण, युवतीना ,महिला वर्ग एकूण अंदाजे ८०० नागरिक मेळाव्यास उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वीते करिता पोलीस स्टेशन चे पोलीस अधिकारी व अंमलदार, त्यामध्ये स.फौ.मचिरके, पोहवा शेडमाके, सुरजागडे, नापोशि पुसू कंगाली,फिरोज गाठले, अजय कांगणे, गोंगलू तिम्मा पोशि महादेव घुगे, राकेश मेश्राम, विनोद बावणे, अशोक मडावी केतन मस्के, कृष्णा कोतकोंडवर, मपोशी आचल कुमरे, वालदे, अल्लमवार हे हजर होते. तसेच एसआरपीएफ चे अधिकारी,व अंमलदार आदींनी परिश्रम घेतले.




**कार्यक्रमाच्या दुसर्या टप्प्यात अध्यक्षांच्या व लाहेरी पोलिसांच्या हस्ते वाटप करण्यात आलेले साहित्य**
१)शिलाई मशीन–२०
२)फवारणी पंप–१३०
३)पाणी बकेट–१३०
४) विळे ,खुरपी ,कुदळे–२००
५) महिलांना साड्या–३००
६) विविध फळ झाडांची रोपटे

## स्नेहदीप मार्शल आर्ट क्लबचा पहिला वर्षपूर्ती सोहळा आणि ७४ वा संविधान दिवस साजरा

**हिंगणघाट । प्रतिनिधी**
राष्ट्रीय सुरक्षा संस्था संलग्नित विरा वॉरियर्स ग्रुप द्वारा संचालित स्नेहदीप मार्शल आर्ट क्लब द्वारा आयोजित पहिला वर्षपूर्ती सोहळा आणि ७४ वा संविधान दिनाचा हा कार्यक्रम हिंगणघाट शहरातील स्नेहदीप इंग्लिश कॉन्व्हेंमध्ये २६ नोव्हेंबरला आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून रोहित राऊत (वीरा वॉरिअर ग्रुपचे अध्यक्ष), संदीप सरोदे (स्नेहदीप स्कूलचे संचालक), राकेश शर्मा (स्टार प्रचारक), गौरव तांबोडी (भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा महामंत्री ), सनीदादा बासनवार(विधान सभा प्रमुख), गौरव खिराले (मातोश्री मार्शल आर्ट क्लबचे संचालक),सेन्साई. कशीच खैरे,(जीवक बुद्ध विहार मार्शल आर्ट क्लब च्या संचालीका), आणि सेन्साई.वैष्णवी पिसे (कृष्णा मार्शल आर्ट क्लब च्या संचालीका), कार्यक्रमाला या पाहुण्यांची प्रमुख उपस्थिती होती आणि या कार्यक्रमांमध्ये स्नेहदीप मार्शल आर्ट क्लबच्या पहिल्या वर्धापन दिन आनंद उत्साहात साजरा करण्यात आला. त्यामध्ये सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला आणि डॉ. बी आर. आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्या अर्पण करून त्यासोबत दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आणि या कार्यक्रमांमध्ये क्लबच्या मुलांनी कराटे, लाटी, नॉन चाकू,काता, यांचे प्रात्यक्षिक दाखविले आणि मुलींनी आत्मा सवरक्षणाचे प्रदर्शन केले. त्याचबरोबर क्लबच्या मुला मुलींनी भाषण देखील दिले. आणि त्यानंतर ७४ वा संविधान दिनानिमित्त संविधानाबद्दल जनजागृती करुन व संविधानाचे महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर उपस्थित पाहुण्यांनी कार्यक्रमाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माही मरापे आणि आस्था रामटेके यांनी केले, त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि कार्यक्रमाचे आभार क्लबचे प्रशिक्षक भुषण वाठोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन करिता विराज गायकवाड, जीविका शेंडे, वेदांत चहाकर, वीर टिचुकले, अर्पित मांडवे, सोहम बाभुळकर, आयुष हमंध, विहान सुपारे, आलोक चौधरी, ऋषिकेश जामूनकर, सक्षम चावरे, पियुश दरवेकर, रुद्र वाट, पृथ्वीराज सरोडे, प्रणय मडावी, ओम चौधरी, हिमांशू चावरे आणि वीरा ग्रुपच्या सीनियर मुलं आणि मुलींनी सहकार्य केले आणि हा कार्यक्रम सुखरूप पणे पार पाडला.



## लिखितवाड्यात रात्र कालीन कबड्डी सामन्यांचे आयोजन

**गोंडपिपरी**
श्री.साई क्रीडा मंडळ लिखितवाड्याच्या वतीने आयोजित केलेल्या तिन दिवसीय दिवसरात्रकालिन पुरुषाचे कब्बडी सामन्यांचे माजी आमदार अँड संजय धोटे यांच्या हस्ते रीतसर उद्घाटन केले. कब्बडी हा खेळ आपल्या मातीशी संलग्न असुन खेळ हा सांकेतिक आहे. प्रत्येक क्षेत्रात यश अपयश लागून असते.यश मिळाले म्हणून माजायचे नाही आणि नाही मिळाले म्हणून लाजायचे नाहीत. अपयश ही यशाची खरी पायरी आहे त्यामुळे खेळाळूनी सांकेतिक खेळ खेळत आपले कौशल्य दाखवायचे आहे.मध्यंतरीच्या काळात कबड्डीकडे दुय्यम भावनेने बघण्याचा एक प्रवाह चालला होता. परंतू मागील सात–आठ वर्षांपासून प्रो–कबड्डी सारख्या भव्य व दिव्य स्पर्धांच्या माध्यमातून आता कबड्डीचे दिवस पालटले आहेत. सद्यस्थितीत प्रो–कब्बडी च्या माध्यमातून देशात कब्बडी ला नावलौकिक प्राप्त झाले. सुदृढ आरोग्य आणि उत्तम सांघिकशक्तीचे दर्शन कबड्डी सारख्या खेळातून नेहमीच घडत असते. याठिकाणी आलेल्या सर्व कबड्डी संघांनी उत्तमरीत्या आपल्या क्रिडाकौशल्याचे प्रदर्शन करावे, आणि प्रेक्षकांचा आनंद द्विगुणित करावा, विजयाकरीता सर्वांनाच माझ्या शुभेच्छा ! ! भावी पुढिल वाटचालीस आपण पुन्हा यश प्राप्त कराल अशी पण व्यक्त करते असे प्रतिपादन याप्रसंगी माजी आमदार संजय धोटे यांनी उदघाटनिय भाषणात बोलताना केले.कार्यक्रम प्रसंगी यावेळी सह उदघाटक तथा नगरपंचायत गोडपिपरी नगरसेवक चेतनसिंह गौर ,अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अमर बोडलावार ,महेंद्रसिंग चंदेल, ग्रामपंचायत सदस्य तथा सहसंयोजक पंचायत राज व ग्रामीण विकास विकास विभाग नागपूर कोमल फरकडे , भाजपा जेष्ट नेते दिपक बोगिनवार चेकलिखितवाडा सरपंच पुष्पा राऊत ,प्रशांत येल्लेवार , कुउबास संचालक सदिप पौरकर , हरिदास मडावी, प्रभाकर कोहपरे , प्रतिमा चंद्रगिरीवार,भाग्यश्री आदे,विनोद आदे..रेखा कोहपरे, वामणराव गेडाम ,रविन्द्र पाल यांचेसह गावातील नागरिक , क्रिडाप्रेमींची मोठी उपस्थिती होती.



## घुग्घुसच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ट्राफिक सिग्नल लावा

### भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांची मागणी

**चंद्रपूर :–** घुग्घुस शहराच्या मध्यभागी असलेल्या नवीन बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ट्राफिक सिग्नल लावा अशी मागणी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी घुग्घुसचे ठाणेदार आसिफराजा शेख यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.घुग्घुस हे औद्योगिक शहर असून लोकसंख्या हि ५० हजारांच्या जवळपास आहे. परिसरात वेकोलिच्या अनेक कोळसा खाणी, सिमेंट उद्योग, लॉयड्स उद्योग आहे. त्यामुळे बसस्थानका जवळील छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहनांची मोठी वर्दळ असते जडवाहनांची व इतर वाहनांची वाहतूक मोठया प्रमाणात सुरु असते.चौकात ट्राफिक सिग्नल नसल्यामुळे वाहतूक विस्कळीत होते तसेच अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकात ट्राफिक सिग्नल लावण्यासाठी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी शिष्टमंडळासह ठाणेदार आसिफराजा शेख यांची भेट घेतली व चर्चा करून निवेदन दिले याप्रसंगी ठाणेदार आसिफराजा शेख यांनी लवकरच ट्राफिक सिग्नल लावण्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले.यावेळी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, भाजपाचे संजय तिवारी, निरीक्षण तांड्रा, संतोष नुने, राजेश मोरपाका, स्वप्नील झाडे व कार्यकर्ते उपस्थित होते.




## खेडी–पोडासा रस्ता बांधकामात मोठा भ्रष्टाचार

### राष्ट्रवादी युवक काँग्रेस आक्रमक: कारवाईची मागणी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**
खेडी गोंडपिपरी रस्ता निर्माण कामामध्ये भ्रष्टाचाराची परी सीमा ओलांडल्याचे काम कंत्राटदारकमार्फत सर्रास सुरू असून शासकीय अधिकाऱ्याकडून या सर्व प्रकरणात उघड डोळे झाक केली जात असल्याने शासनाचा करोड रुपयाचा महसूल चोरला जात आहे. गोंडपिपरी शहरात व वडोली गोंडपिपरी धाबा पर्यंत अर्धवट निर्माण कामामध्ये आतापर्यंत करोड रुपयांचा वर भ्रष्टाचार केला गेला असून रस्ता निर्माण करणाऱ्या कंत्राटदाराकडून पूर्वीचा मजबूत डांबर रोड फोडून त्या रस्त्याचा मलमा रोज मोठ्या प्रमाणात विक्री केला जात आहे.त्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून कोटी रुपयांच्या घरात शासनाचा महसूल विकला जात असून याच रस्त्याच्या खोदकामासाठी शासनाकडून कोटी रुपये वसूल केले जात आहे.असाच एकंदरीत दुहेरी पद्धतीने भ्रष्टाचार सध्या गोंडपिपरी शहरात सुरू आहे. रस्ता निर्माण कामात शासनाच्या निष्कर्षाला धाब्यावर बसवीत मोठा भ्रष्टाचार करून हा रस्ता निर्माण केला जात असून पुढे पाठ मागे सपाट अशा पद्धतीचा हा रस्ता सध्या खेडी,गोंडपिपरी,धाबा येथे निर्माण केला जात असल्याने पुढील काही महिन्यानंतर हा निर्माण रस्ता गावातील नागरिकांसाठी मोठे डोकेदुखी ठरणार आहे.मागील पाच वर्षापासून अशाच पद्धतीने रस्ता निर्माण करण्यात येत आहे.हा रस्ता निर्माण करताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने आता या रस्त्यावरील गिट्टी उकडली असून रोज ही गिट्टी उडून अनेक व्यक्ती जखमी होत आहे. निष्कृष्ट दर्जाचा केला जात असलेला विकास हा विकास नसून शहर भकास करण्याचा अजेंडा असल्याचे विरोधक देखील मोठ्या प्रमाणात बोलू लागले आहे.शहरातील नागरिकाकडून देखील अशा पद्धतीने निर्माण भ्रष्टाचाराच्या रस्त्यावरील प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.शासनाच्या रस्त्याच्या बांधकामात निघालेले साहित्य, मलमा हे शासकीय मालमत्तेचे असताना त्यांनी परस्पर विक्री करण्याचे आदेश कंत्राटला दिले कोणी या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा असे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय ठाकूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता यांना दिले आहे.



# गोंडवाना विद्यापीठात व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न

## भारतीय राज्यघटना सोशल डॉक्यूमेन्ट आहे –श्रीमंत माने

**गडचिरोली । प्रतिनिधी**
भारत देश स्वतंत्र होऊन ७५ वर्ष झाली.या देशाला आपण काय देतो. याचा विचार आपण करत नाही.भारतात विविधतेतून एकता आहे.इतक्या भाषा , इतके प्रांत यांची वाटचाल कशी झाली याचा खोलात जाऊन आपण कधी विचार करतोय काय , स्वातंत्रासाठी अनेक हुतात्मे लढले पण त्यांची आपल्याला किंमत नाही .समाजातील सगळ्या बाबींचा तुलनात्मक अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहिली.स्वातंत्र, समता, बंधुता ही त्रिसूत्री आपल्याला घटनेने दिली.मतदानाचा समान अधिकार दिला. त्यासाठी आपण कृतज्ञ असायला पाहिजे.संविधानाने जगाकडे पाहण्याची दृष्टी दिली . राजघटनेच्या अमृत महोत्सवा निमित्त आपण स्मरण करू असे हे सोशल डॉक्युमेंट आहे असे प्रतिपादन लोकमतचे संपादक श्रीमंत माने यांनी केले.गोंडवाना विद्यापीठात २८ नोव्हेंबर ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रा तर्फे संविधान दिनाचे औचित्य साधून 'राज्यघटनेने सामान्य भारतीयांना काय दिले ?' या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते मुख्य वक्ता म्हणून ते बोलत होते. तसेच त्यांनी स्वातंत्र्य पूर्व काळातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सती प्रथा, या विषयांवर प्रकाश टाकला.या प्रसंगी संविधानाची उद्देशिका आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे प्र–कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वांनी वाचन केले. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे तर विशेष उपस्थिती म्हणून कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण,मानवविज्ञान विदयाशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप बारसागडे , लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक आनंद डेकाटे उपस्थित होते.अध्यक्ष स्थानावरून बोलतांना गोंडवाना विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या प्रमाणात वाचन केले होते त्या आधारावर प्रत्येक मुद्दा न मुद्दा त्यांनी स्पष्ट केलाय. राज्यघटना आजही आपण समजून घेत नाही. आपण जी संविधानाची उद्देशिका वाचतो ती समजून घेतली पाहिजे. तरच या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचा उपयोग होईल असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप बारसागडे, संचालन मराठीचे स. प्रा. डॉ. हेमराज निखाडे तर आभार कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समनव्यक डॉ. प्रीती काळे तसेच इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



सह्याद्रीचा राखणदार



# पुलगाव रुग्णालयात महिला डॉक्टर नसल्याने परिचारिकेलाच करावी लागते प्रसूती

**पुलगाव । अविनाश भोपे**

महिलांवर उपचार करण्याकरिता तज्ञा महिला डॉक्टरची पुलगाव रुग्णालयाला गरज आहे .वारंवार मागणी करून देखील या रुग्णालयाला डॉक्टर मिळत नाही, प्रसूती करिता महिला रुग्ण आल्यावर त्यांना वर्धा, सावंगी किंवा सेवाग्राम रुग्णालयात पाठविण्यात येते .प्रसुतीची वेळ जवळ आली असेल तर मात्र परिचारिकेलाच प्रसूती करावी लागते. गेल्या अनेक दिवसापासून हाच प्रकार या रुग्णालयात सुरू आहे.

मंगळवार २१ नोव्हेंबर रोजी सकाळी एक गरोदर महिला प्रसुतीकरिता पुलगाव ग्रामीण रुग्णालयामध्ये आली महिला डॉक्टर नसल्याने उपस्थित डॉक्टरांनी वर्धा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला .ती महिला वर्धा रुग्णालयापर्यंत पोहोचेल अशी स्थिती नव्हती वाटेतच तिची प्रसुती होईल असे उपस्थितांना जाणवत होते. येथील निवासस्थानामध्ये राहणारी परिचारिका त्यावेळी ग्रामीण रुग्णालयात आली त्यांनी परिस्थिती पाहिली व उपस्थितांना या महिलेला वर्धा रुग्णालयात पाठवू नका वाटतेतच तिची प्रसूती होईल असे सांगितले. तिला रुग्णालयात दाखल करून घेतले व अवघ्या काही वेळानंतर त्या महिलेची प्रसूती झाली. पुलगाव ग्रामीण रुग्णालयात एकही एमबीबीएस महिला डॉक्टर कार्यरत नाही त्यामुळे गरोदर महिलांची फजिती होत आहे .ग्रामीण भागातील अनेक प्रस्तुत महिला उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालयात येतात त्यांना महिला डॉक्टर नसल्याने योग्य उपचार मिळत नाही, ही वास्तविकता आहे .ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना आर्थिक अडचण असताना देखील खाजगी डॉक्टरांकडे उपचार घ्यावे लागतात त्यातून त्यांची लूट होते.विशेष म्हणजे गेल्या काही दिवसापासून या रुग्णालयातील डॉक्टर व इतर कर्मचारी संपावर आहेत त्यामुळे कायमस्वरूपी असलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठ्या प्रमाणात अतिरिक्त भार आला आहे. एकंदरीतच तज्ञ वैद्यकीय अधिकारी नसल्याने पुलगाव ग्रामीण रुग्णालय रामभरोसे असल्याचे दिसते. या रुग्णालयाला शहर तथा ग्रामीण भागातील नागरिक ग्रामीण रुग्णालया ऐवजी रेफर रुग्णालय या नावाने संबोधतात.

**रुग्णसेवा परिचारिकेवर अवलंबून**

**येथील रुग्णालयात फक्त परिचारिका कार्यरत असतात त्या कार्यरत राहण्याची निश्चित वेळ आहे .परिचारिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो .रात्रभर रुग्णांची ये जा असते, सर्व रुग्णांना इंजेक्शन, सलाईन, औषधी वितरित करण्यापासून येथील नोंदबुकात नावाची नोंदणी करून घेणे आदी सर्वच कामे या परिचारिकांना करावी लागते. रात्री एकच परिचारिका येथे कार्यरत राहते तिची काय अवस्था होते याचा विचार जिल्हा आरोग्य अधिकारी करणार काय ?**

**बीपी वाढला वर्धेला जा**

**बीपी, शुगर हा आजार हल्ली प्रत्येकाला दिसतो, थोडा जरी बीपी वाढला व तो रुग्ण तपासणी करिता ग्रामीण रुग्णालयात आला तर त्याला येथे औषधोपचारा ऐवजी वर्धा येथील रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात येतो. रोज हा सल्ला किती लोकांना मिळतो हे मात्र सांगता येत नाही.**

# निखिल मांडवकर यांची युवासेनेच्या विधानसभा समन्वयक पदी नियुक्ती

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व गोर गरीब जनतेच्या हाकेला धावून जाणारे निखिल मांडवकर यांची युवासेनेतील कामगिरी बघता युवासेनेच्या वरोरा – भद्रावती विधानसभा प्रमुख पदी वर्णी लागली आहे. त्यांच्या या नियुक्ती बद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे व युवासेना जिल्हाप्रमुख मनीष जेठाणी यांनी अभिनंदन केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील युवासेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहे.यामध्ये युवासेनेत सक्रियरित्या कार्य करणारे धडाडीचे कार्यकर्ते निखिल चिंतामणी मांडवकर यांची वरोरा – भद्रावती विधानसभा समन्वयक पदी वर्णी लागली आहे. त्यांनी कोरोना काळात अनेक गोरगरिबांसाठी अन्नदान अभियान सुद्धा राबविले आहे. तसेच ग्रामीण विद्यार्थांना बससेवेत



झालेल्या अडचणीसाठी अनेकदा पुढाकार घेऊन समस्या सोडविल्या आहे. तसेच शेतकऱ्यांना उद्भवणाऱ्या वीज समस्येविषयी अधिकाऱ्यांना धारेवर धरण्याचे काम सुद्धा यांच्या वतीने करण्यात आले. तसेच रस्त्यासंबंधित उद्भवणाऱ्या समस्या व अश्या अनेक समस्यांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन समस्या मार्गी लावल्या तसेच पक्ष वाढीसाठी अनेक तरुणांचा पक्षात प्रवेश सुद्धा मांडवकर यांच्या माध्यमातून करण्यात आला. त्यांच्या नियुक्तीबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे व युवासेना जिल्हाप्रमुख मनीष जेठाणी यांनी अभिनंदन केले. यावेळी युवासेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, जेष्ठ शिवसैनिक चिंतामणी मांडवकर व आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी माडला संविधानाचा जागर




**वर्धा । प्रतिनिधी**

संविधान दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर ला संत तुकडोजी महाराज ग्राउंड वर्धा येथे राष्ट्र निर्माण मे समर्पित बुद्ध चरित्र भगवान कथा की अमृत वर्धा या प्रोग्राम मध्ये आयोजीत केलेल्या अष्टमंगम फाउंडेशन वर्धा.(महाराष्ट्र) खडसे व त्यांच्या संपूर्ण टीम ने आयोजित केलेल्या या कार्यक्रमा मध्ये संविधान दिनाच्या विशेष संविधानाचा जागर पथनाटीकेच्या माध्यमातून शिक्षक, रोजगार, बाल हक्क, मतदानाचा हक्क, मूलभूत हक्क या वर पथनाटिका सदर करण्यार आली.

अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रोशन नवघरे, राहुल दूधकोर, प्रमोद काटावे, कल्पना सातव, प्रियांका नागतोडे, प्रतीक्षा सरमाके यांनी ही नाटिका सादर केली.

# शासकीय आधारभूत धान खरेदी नोंदणीची मुदत ३१ डिसेंबर वाढवून द्यावी – सभापती राकेश रत्नावार

**मुल । प्रतिनिधी**

एकतर शासनाने मुल येथे देण्यात येणारे आधारभूत धान खरेदी केंद्र सुरवातीला नवरगाव येथे देण्यात आले होते.त्यामुळे मुल तालुक्यातील शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ सुरू झाली. यासाठी सी.डी सी.सी.बँकेचे अध्यक्ष यांनी शेवटी राज्याचे विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांचेकडून मुल येथे आधारभूत खरेदी केंद्र उशिरा मंजूर केले. त्यामुळे उशिरा सुरू झालेली नोंदणी ३० नोव्हेंबर रोजी संपत असल्याने आजच्या स्थितीत हजारो शेतकरी नोंदणी करण्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. एकीकडे आकस्मिक अवकाळी पाऊस आल्याने मुल तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांचे धान कापून असल्याने पाण्यामुळे भिजून खराब झाले आहे. करीता ओले झालेल्या धानाला अतिशय कमी भाव मिळेल किंवा व्यापारी ते धान खरेदी



करणार नाही. त्यामुळे शेकऱ्यावर संकट कोसळले आहे. आकस्मिक पाऊसामुळे ओले धानाचे पीक वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याने शेतकऱ्यांना नोंदणी करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये येऊन नोंदणी करण्यासाठी वेळ नाही. इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था मुल तालुक्यातील शेतकरी बांधवांची झाली आहे. एकतर उशिरा नोंदणी सुरू केल्यामुळे मुदतीच्या आत तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची नोंदणी होऊ शकली नाही. अजूनही असंख्य शेतकरी वंचित आहेत. करीता दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी ३१ डिसेंबर पर्यंत सलग एक महिना मुदत वाढ त्वरित देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राकेश रत्नावार यांनी चंद्रपूर जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

# व्वा तहसीलदार साहेब ! दिव्यांग कार्तिकला दिला शासकीय योजणांचा लाभ

**आष्टी । नितिन गडलिंग**

तालुक्यातील मोई (तांडा) येथील दिव्यांग मुलाला आष्टी तहसीलदार सचिन कुमावत यांनी कवेत घेऊन लाड केला. परिस्थितीची जाणीव घेत विचारपूस केली. त्याला शासकीय योजनेचा लाभ मिळवून देत माणुसकीचा परिचय दिला. तहसीलदारांच्या या उपक्रमाचे माजी सरपंच किसन महाराज चव्हाण यांनी कौतुक केले. आष्टी तालुक्यातील डोंगरावर व वनविभागाच्या विळख्यात वसलेल्या मोई (तांडा) येथील गावातील संजय चव्हाण यांच्याकडे शेती नाही. वडिलांना दोन एकर शेती मिळाली तीही वडिलोपार्जितच. त्याच शेतीतून उत्पादन काढून परिवाराला पालन पोषणाचे काम करण्यात येते. शेत मजुरी करून परिवाराचा उदर निर्वाह केला जातो. लग्नानंतर संजयला मुलगा झाला तो



जन्माला आला तर अपंग होता. काळजाचा तुकडा म्हणून त्याला लहानाचे मोठे केले. त्याला बोलता व चालता येते नाही. पण, हात वारे केले तर समजतो. हसरा असा त्याचा स्वभाव.त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी वडिलांची आहे. त्याला सोडून आई कामाला जाऊ शकत नाही व वडील संजय यांच्या मजुरीवर घर खर्च होत नाही. ही व्यथा माजी सरपंच तसेच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य किसन महाराज चव्हाण यांनी ही आपबीती तहसीलदार कुमावत यांना सांगितली. तहसीलदारांनी तत्काळ दखल घेऊ असे आश्वासन दिले. आई व वडील संजय यांनी मुलगा कार्तिक याला घेऊन तहसीलदार यांचे दालन गाठले आणि चर्चेला सुरवात झाली. घटनाक्रम ऐकून घेतल्यावर तहसीलदार कुमावत यांनी मुलगा कार्तिक याला कवेत घेऊन लाड केले व मायेचा हात फिरवीला. असा अधिकारी एका निरागस गोंडस मुलाचा लाड करतात हे पाहून आई वडिलांना अश्रू अनावर झाले. तहसीलदार यांनी तत्काळ तलाठी यांना बोलवून शासकीय योजना संजय गांधी या योजनेचा लाभ देण्यासाठी मदतीला धावून आले. कार्तिकला कार्तिक एकादशीच्या दिवशी शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला. तहसीलदार कुमावत यांचे माजी सरपंच किसन महाराज चव्हाण आई व संजय चव्हाण यांनी आभार मानले.

# श्रीराम जन्मभूमीवरून आलेल्या अक्षता कलशाचे आलापल्लीत रॅली काढून स्वागत..



**अहेरी । प्रतिनिधी**

श्री रामजन्मभूमी अयोध्यातून आलेल्या पवित्र अक्षता कलशाचे मंगळवारी, २८ नोव्हेंबर रोजी आलापल्लीत विश्व हिंदू परिषदचे कार्यकर्ते व रामभक्तांनी जल्लोषात स्वागत केले. यावेळी मूलचेरा मार्गावरील मोद्दुमडगु येथील काली मंदिरातून वीर बाबुराव या मुख्य चौकातून श्रीराम मंदिर पर्यंत कलशाची विधिवत पूजन करून वाजतगाजत जय श्रीराम चा उद्घोष करत रॅली काढण्यात आली.यावेळी मोठ्या प्रमाणात मातृशक्ती सुद्धा उपस्थिती होती.अयोध्या येथील श्री रामजन्मभूमी येथे साकारलेल्या भव्य मंदिरात २२ जानेवारी रोजी श्री रामलला विराजमान होत आहे. या सोहळ्यात देशातील सर्व हिंदू कुटुंबांना या पवित्र अक्षता देऊन आमंत्रित करण्यात येणार आहे. याकरिता रामजन्म भूमी तिर्थक्षेत्राच्या वतीने देशभरात अक्षता कलश यात्रेचे आयोजन काढण्यात आले आहे.या अक्षत कलशाचे मंगळवारी दुपारच्या सुमारास चंद्रपूर जिल्ह्यातुन आल्लापल्ली येथे आगमन झाले. श्रीराम मंदिरात हा अक्षता कलश मातृशक्तीच्या हस्ते पूजन करून, आरती करून दर्शनासाठी ठेवण्यात आला आहे.रामजन्मभूमीसाठी ज्यांनी सहकार्य केले त्यांना या अक्षताचे वाटप करून अयोध्या येथील राममंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला निमंत्रित करण्यात येणार आहे.यावेळी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष सीताराम सोननिया,जिल्हा मंत्री अमित बेझलवार यांच्यासह विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी व स्वयंसेवक तथा मातृशक्ती व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूल येथील नव्याने तयार झालेल्या व्यापारी संकुलला क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व्यापारी संकुल असे नाव द्या

## राष्ट्रवादी कॉग्रेसच्या अजित पवार गटाची आग्रही मागणी

**मूल । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत मूल शहरांमध्ये नगरपरिषदेने नव्याने तयार केलेल्या व्यापारी संकुलला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व्यापारी संकुल असे नामकरण करण्याची आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट )वतीने मूल नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना निवेदनातून राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल शहर अध्यक्ष आकाश येसनकर यांनी केली.

महात्मा जोतीराव फुले 'पुणे कमर्शियल आणि कॉट्रॅक्टींग कंपनी' चे कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती, व्यापारी आणि नामवंत शेतकरी म्हणून महात्मा जोतिरावांचा नावलौकिक होता. या कंपनीने धरणं, कालवे, बोगदे, पूल, इमारती, कापडगिरण्या, राजवाडे, रस्ते आदींची भव्य आणि देखणी बांधकामं केली. जोतीरावांच्या उद्योगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही.आता च्या व्यापारी तत्वावरील सर्व व्यवहारा मध्ये भ्रष्ट व्यवहार आढळून येतात.त्यानी खडकवासला धरणाच्या बांधकामात दिलेल्या योगदानातील त्यांचा स्वच्छपणा वाखानण्या जोगाच! व्यापार ,उद्योग क्षेत्रात



दिलेले योगदान,त्यातून मिळालेले न्याय्य आणि प्रामाणिकपणाचे धडे त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्या इतकेच महत्त्वाचे. त्यांच्या कार्याचा उदो उदो करण्याची संधी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुल शहराला नामकरणाच्या माध्यमातून मिळत आहे.रंगमंचावर झालेल्या नगरपालिकेच्या व्यापारी संकुलला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व्यापारी संकुलन असे नामकरण करण्यात यावे ही निवेदनाद्वारे नम्र विनंती करण्यात आली.सदर मागणी ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे रोहित कामडे आ.भा.समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा.विजय लोनबले,हसन वाढई,कैलाश चलाख, गुरु गुरनुले, विवेक मुक्तेलवार , नलिनी आडपवार, शोभा बेलसरे, समता बनसोड, राधिका बुक्कावार, मनोज दाबणपल्लीवर,यांनी पाठिंबा दर्शिवला.निवेदन देताना राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष आकाश येसनकर,महेंद्र गोगले,प्रणय रायपुरे,रजत कुकडे, निहाल गेडाम,वतन चिकाटे, रुपेश मेश्राम, तरबेज सय्यद, उबेद शेख, रोहित खोब्रागडे, साहिल बारसागडे, मंथन सिडाम, कमरान खान, शुभम बंडीवार, राहुल वाघमारे, निलेश वाळके, कृष्णा बोरेवार, प्रविण बोबाटे, शुभम निगमगडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .